(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[२०२२] ३ एस. सी. आर. ११४८

अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर रिअल इस्टेट फंड

-विरुद्ध-

धर्मेश एस. जैन आणि अन्य

(विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र. १४७२४/२०२१)

मधील

(संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१)

मधील

(अवमान याचिका (दि) क्र. ९४०/२०२१)

१० मार्च २०२२

**[एम. आर. शाह, न्यायमूर्ती आणि बी. व्ही. नागरथना, न्यायमूर्ती]**

*न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ - दिवाणी अवमान - न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांची बुद्धिपुरस्सर अवज्ञा - उच्च न्यायालयाने, उत्तरवादी - अभिकथित अवमानकर्ते यांच्या विरुध्द याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या लवाद कार्यवाहीत दिलेल्या लवाद निवाड्यास रक्कम जमा करण्याच्या अधीन राहून स्थगिती दिली - उपलक्षणेने स्थगिती आदेश पुढे चालू ठेवताना सर्वोच्च न्यायालयाद्वारे दोन वेळा अशी रक्कम भरण्याच्या मुदतिचा कालावधी वाढविण्यात आला होता - उत्तरवादी-अवमानकर्ते यांचा युक्तिवाद असा होता की बुद्धिपुरस्सर अवज्ञा केली नसून आर्थिक अडचणींमुळे ते उच्च न्यायालयाने आणि सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्याप्रमाणे रक्कम जमा करण्याच्या स्थितीत नव्हते - यापूर्वी कोणत्याही वेळेस असा युक्तिवाद सादर करण्यात आला नव्हता - असा निर्णय दिला कि : वस्तुस्थितीनुसार, हा युक्तिवाद पश्चात बुद्धीचा असल्याकारणाने त्यामध्ये प्रामाणिकतेचा अभाव असून तो समर्थनीय नाही - जेव्हा आदेशातील अटींचे किंवा निदेशांचे पालन करणे आवश्यक असलेल्या पक्षाने आदेशात नमूद केलेल्या वेळेच्या आत केले नसेल, तेव्हा अशा आदेशाचे पालन करणे आवश्यक*

*असलेल्या पक्षाकडे दोन पर्याय उपलब्ध असतात; ते म्हणजे, (क) ज्या परिस्थितीमुळे पक्षकराला न्यायालयाच्या आदेशाचे पालन करता आले नाही त्या परिस्थितीबाबत न्यायालयाला स्पष्टीकरण देणे; (ख) न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी आणखी वेळ मागणे - जर आदेशातील अटींचे पालन करण्यात विलंब झाला असेल आणि ज्या पक्षाला आदेशाचे पालन करावयाचे होते त्या पक्षाने वर नमूद दोन पर्यायांपैकी कोणत्याही एका पर्यायाचा अवलंब केला नसेल, तर आदेशाचे पालन करण्यात झालेल्या विलंबासाठी जबाबदार असलेल्या पक्षाला अवमान केला म्हणून जबाबदार धरण्यात यावे - पुढे, हुकूमनामा अंमलबजावणीयोग्य आहे की नाही हे लक्षात न घेता, अवमान झाल्याचे सिद्ध झाले का हे निश्चित करण्यामध्ये विचार करावयाचा प्रश्न असा आहे कि अवमानकर्त्याची वर्तणूक हि न्यायालयाच्या अवमानसाठी द्यावयाच्या शिक्षेसाठी योग्य ठरेल अशी होती का -प्रस्तुत प्रकरणात, उत्तरवादी-अवमानकर्ते यांची वर्तणूक हि सर्वोच्च न्यायालयाच्या अवमान अधिकारितेचा वापर करणे समर्थनीय होईल अशी होती - अवमानकर्त्यांनी, अशा कसूरीसाठी कारण स्पष्ट न करता किंवा अनुपालनासाठी मुदत वाढवण्याची मागणी न करता, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्यात अवास्तव विलंब आणि कसूर केला एवढेच नव्हे तर त्यांनी आदेशाच्या अनुपालनासाठी दिलेल्या वाढीव कालावधीचा लाभ घेतल्यानंतर देखील आदेशाचे पालन टाळण्याचा प्रयत्न सुद्धा केला - अवमानकर्ते, या टप्प्यावर, असा दावा करू शकत नाहीत की रक्कम जमा करण्याची अट हि अनिवार्य नव्हती तर निर्देशक स्वरूपाची होती आणि त्यामुळे त्याचे पालन न करणे अवमान होणार नाही -वस्तुस्थिती अशी आहे कि, उत्तरवादी-अवमानकर्ते यांनी न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे बुद्धिपुरस्सर अवज्ञा केली आणि म्हणून ते दिवाणी अवमानासाठी दोषी ठरले आणि न्यायालय अवमान अधिनियमाच्या तरतुदींनुसार योग्य त्या शिक्षेसाठी स्वतःला उत्तरदायी केले - लवाद व समेट अधिनियम, १९९६ - कलम ३४.*

*न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ - अवमान अधिकारिता - न्यायालयाच्या अधिकारांचा वापर करणे - त्याची व्याप्ती आणि विस्तार - असा निर्णय दिला कि :ज्या आदेशाचा किंवा हुकुमनाम्याचा अवमान केल्याचे अभिकथन केले आहे, तो आदेश किंवा हुकूमनामा अवमान कार्यवाहीचा अवलंब न करता देखील कायद्यानुसार*

*अंमलबजावणीयोग्य आहे, केवळ या कारणामुळे या अधिनियमाखाली न्यायालयाचे अधिकारक्षेत्र संपुष्टात येणार नाही - जेव्हा अवमानकर्त्याची वर्तणूक हि न्यायदानाच्या कामकाजाशी हस्तक्षेप करणारी असेल तेव्हा प्रत्येक प्रकरणात अवमान अधिकारितेचा अवलंब केला जाऊ शकतो - अवमान हा विषय ज्या आदेशाचा अवमान केल्याचा आरोप आहे ते आदेश पारित करणारे न्यायालय आणि अवमानकर्ता यांच्यातील आहे; अशा आदेशाच्या अंमलबजावणीबाबतचा प्रश्न हा असा प्रश्न आहे जो परस्पर पक्षांशी संबंधित आहे - अवमान अधिकारिता वापरण्याच्या न्यायालयाच्या अधिकारामध्ये कोणत्याही प्रकारे पक्षांच्या परस्पर अधिकारांने फेरफार करता येणार नाही.*

**न्यायालयाने अवमान याचिका निकाली काढतांना,**

**असा निर्णय दिला कि : १.१ प्रस्तुत प्रकरणात, उच्च न्यायालयाने दि. ०८ ऑगस्ट २०१९ रोजी च्या आदेशाने, रक्कम जमा करण्याच्या अटीच्या अधीन, याचिकाकर्त्याने उत्तरवादी- अभिकथित अवमानकर्त्यांविरुद्ध दाखल केलेल्या लवाद कार्यवाहीत दि. ३०/०८/२०१८ रोजी पारित केलेल्या लवाद निवाडयाला स्थगिती दिली. उपलक्षणेने स्थगिती आदेश पुढे चालू ठेवताना दोन वेळा या न्यायालयाद्वारा अशी रक्कम भरण्याच्या मुदतीचा कालावधी वाढविण्यात आला होता. वाढविलेल्या मुदतीच्या कालावधीचा फायदा घेत, उत्तरवादी-अवमानकर्ते, या टप्प्यावर, असा युक्तिवाद करू शकत नाही की रक्कम भरण्याच्या आदेशाचे अटींचे पालन न केल्यामुळे केवळ लवादाचा निवाडा अंमलबजावणीयोग्य होईल आणि पालन करण्यात झालेल्या अशा कसूरी मुळे न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ अंतर्गत कोणतेही परिणाम होणार नाहीत. [परिच्छेद १३.१] [११७० - बी - सी][परिच्छेद १३.१] [११७० - बी - सी]**

**१.२. पुढे, हा अगदी सामान्य कायदा आहे कि, न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ अंतर्गत न्यायालयाची अधिकारिता, केवळ ज्या आदेशाचा किंवा हुकुमनाम्याचा अवमान केल्याचे अभिकथन केले आहे, तो आदेश किंवा हुकूमनामा अवमान कार्यवाहीचा अवलंब न करता देखील कायद्यानुसार अंमलबजावणीयोग्य आहे, केवळ या कारणामुळे या अधिनियमाखाली न्यायालयाचे अधिकारक्षेत्र संपुष्टात येणार नाही. [परिच्छेद १३.२] [११७०-डी]**

**१.३. जेव्हा अवमानकर्त्याची वर्तणूक हि न्यायदानाच्या कामकाजाशी हस्तक्षेप**

करणारी असेल तेव्हा प्रत्येक प्रकरणात अवमान अधिकारितेचा अवलंब केला जाऊ शकतो. अवमान हा विषय ज्या आदेशाचा अवमान केल्याचा आरोप आहे ते आदेश पारित करणारे न्यायालय आणि अवमानकर्ता यांच्यातील आहे; अशा आदेशाच्या अंमलबजावणीबाबतचा प्रश्न हा असा प्रश्न आहे जो परस्पर पक्षांशी संबंधित आहे - अवमान अधिकारिता वापरण्याच्या न्यायालयाच्या अधिकारामध्ये कोणत्याही प्रकारे पक्षांच्या परस्पर अधिकारांने फेरफार करता येणार नाही. [परिच्छेद १३.३] [११७०-ई]

२. आता, उत्तरवादीतर्फे करण्यात आलेल्या जितपत युक्तिवाद कि, त्यांनी बुद्धिपुरस्सर अवज्ञा केली नाही आणि आर्थिक अडचणींमुळे उत्तरवादी उच्च न्यायालयाने दि. ०८/०८/२०१९ रोजी च्या आदेशान्व्ये आदेशित केल्याप्रमाणे रक्कम जमा करण्याच्या स्थितीत नाहीत आणि या न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाचा संबंध असेल तितपत ते दुसरे काही नसून पश्चात बुद्धीनुसार करण्यात आलेला युक्तिवाद आहे. यापूर्वी कधीही असा युक्तिवाद सादर करण्यात आला नव्हता. प्रकरणाची तथ्ये आणि परिस्थिती पाहता, अशी भूमिका घेण्यामध्ये आता प्रामाणिकतेचा अभाव आहे. उत्तरवादींनी आता घेतलेली भूमिका की ते आर्थिक अडचणींमुळे रक्कम जमा करण्याच्या स्थितीत नाहीत आणि/किंवा उच्च न्यायालय आणि या न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाचे पालन करण्याच्या स्थितीत नाहीत आणि म्हणूनच उच्च न्यायालयाने दि. ०८/०८/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे आणि या न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र. १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ मध्ये दि. २८/१०/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न करण्यात उत्तरवादींनी बुद्धिपुरस्सर अवज्ञा केलेली नाही, अशी घेतलेल्या भूमिकेत सद्भावनेचा अभाव आहे आणि ती भूमिका मुळीच स्वीकार्य नाही. [परिच्छेद १४] [११७०-एफ-जी; ११७१-सी-डी]

३.१. जेव्हा आदेशातील अटींचे किंवा निदेशांचे पालन करणे आवश्यक असलेल्या एखाद्या पक्षाने आदेशात नमूद केलेल्या वेळेच्या आत तसे पालन केले नसेल, तर तेव्हा अशा आदेशाचे पालन करणे आवश्यक असलेल्या पक्षाकडे दोन पर्याय उपलब्ध असतात; ते म्हणजे (क) ज्या परिस्थितीमुळे पक्षकाराला न्यायालयाच्या आदेशाचे पालन करता आले नाही त्या परिस्थितीबाबत न्यायालयाला स्पष्टीकरण देणे; (ख) न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी आणखी वेळ मागणे. जर आदेशातील

अटींचे पालन करण्यात विलंब झाला असेल आणि ज्या पक्षाला आदेशाचे पालन करावयाचे होते त्या पक्षाने वर नमूद दोन पर्यायांपैकी कोणत्याही एका पर्यायाचा अवलंब केला नसेल, तर आदेशाचे पालन करण्यात झालेल्या विलंबासाठी जबाबदार असलेल्या पक्षाला अवमान केला म्हणून जबाबदार धरण्यात यावे. [परिच्छेद १५] [११७१- डी - एफ]

३.२. पुढे, हुकूमनामा अंमलबजावणीयोग्य आहे की नाही हे लक्षात न घेता, अवमान झाल्याचे सिद्ध झाले कि का हे निश्चित करण्यामध्ये विचार करावयाचा प्रश्न असा आहे कि अवमानकर्त्याची वर्तणूक हि न्यायालयाच्या अवमानसाठी द्यावयाच्या शिक्षेसाठी योग्य ठरेल अशी होती का ?[परिच्छेद १५.१] [११७१-जी]

४.१. सध्याच्या प्रकरणात, उत्तरवादी-अवमानकर्ते यांची वर्तणूक हि सर्वोच्च न्यायालयाच्या अवमान अधिकारीतेचा वापर करणे समर्थनिय होईल अशी होती. अवमानकर्त्यांनी, अशा कसूरीसाठी कारण स्पष्ट न करता किंवा अनुपालनासाठी मुदत वाढवण्याची मागणी न करता, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्यात अवास्तव विलंब आणि कसूर केला एवढेच नव्हे तर त्यांनी आदेशाच्या अनुपालनासाठी दिलेल्या वाढीव कालावधीचा लाभ घेतल्यानंतर देखील आदेशाचे पालन टाळण्याचा प्रयत्न सुद्धा केला. अवमानकर्ते, या टप्प्यावर, असा दावा करू शकत नाहीत की रक्कम ठेवण्याची अट हि अनिवार्य नव्हती तर निर्देशक स्वरूपाची होती आणि त्यामुळे त्याचे पालन न करणे अवमान होणार नाही. [परिच्छेद १६] [११७१-एच; ११७२-ए-बी]

४.२. उत्तरवादींनी वाणिज्यिक लवाद याचिका क्र. ५५/२०१९ मधील प्रस्ताव सूचना क्र. ९६०/२०१९ मध्ये उच्च न्यायालयाने दि ०८/०८/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा केली आहे तसेच विशेष अनुज्ञा याचिका (सी) क्र. १४७२४/२०२१ मधील  संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ मध्ये या न्यायालयाने दि. २८/१०/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा केली आहे आणि त्याद्वारे उत्तरवादी दिवाणी अवमानासाठी दोषी आहेत आणि त्यांनी न्यायालय अवमान कायद्याच्या तरतुदींनुसार योग्य त्या शिक्षेसाठी स्वतःला उत्तरदायी केले आहे. [परिच्छेद १७] [११७२-सी-डी]

सुधीर वासुदेव -विरुद्ध- एम. जॉर्ज रविशेखरन **(२०१४) ३ एस. सी. सी. ३७३ :**

**[२०१४] ४ एस. सी. आर. २७;** आर. एन. डे आणि इतर -विरुद्ध- भाग्यबती प्रामाणिक आणि इतर **(२०००) ४ एस. सी. सी. ४०० : [२०००] ३ एस. सी. आर. १७२ – उल्लेखनीय.**

रमा नारंग -विरुद्ध- रमेश नारंग **(२००६) ११ एस. सी. सी. ११४ : [२००६] ३ एस. सी. आर. १०६८;** बँक ऑफ बडोदा -विरुद्ध- सद्रुद्दीन हसन दया **(२००४) १ एस. सी. सी. ३६०: [२००३] ६ सप्ले. एस. सी. आर. ७६४;** स्टेट ऑफ बिहार -विरुद्ध- सुभाष सिंग **(१९९७) ४ एस. सी. सी. ४३० : [१९९७] १ एस. सी. आर. ८५०;** मारुती उद्योग -विरुद्ध- महिंदर सी. मेहता **ए. आय. आर. २००८ एस. सी. ३०९: [२००७] १० एस. सी. आर. ९३३ - वर विसंबून होते.**

मृत्युंजय दास आणि अन्य -विरुद्ध- सय्यद हसीबुर रहमान आणि इतर **(२००१) ३ एस. सी. सी. ७३९ : [२००१] २ एस. सी. आर. ४७१;** राम किशन -विरुद्ध- तरुण बजाज आणि इतर **(२०१४) १६ एस. सी. सी. २०४ : [२०१४] १ एस. सी. आर. ५३८;** दिनेश कुमार गुप्ता -विरुद्ध- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आणि इतर, **(२०१०) १२ एस. सी. सी. ७७० : [२०१०] १३ एस. सी. आर. ५९९;** जॉली जॉर्ज वरघिस आणि अन्य -विरुद्ध- द बँक ऑफ कोचीन **(१९८०) २ एस. सी. सी. ३६०: [१९८०] २ एस. सी. आर ९१३;** डॉ. यू. एन. बोरा, माजी. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर -विरुद्ध- आसाम रोलर फ्लोअर मिल्स असोसिएशन आणि अन्य **(२०२२) १ एस. सी. सी १०१;** रीटा मार्कंडेय -विरुद्ध- सुरजित सिंग अरोरा **(१९९६) ६ एस. सी. सी. १४ : [१९९६] ७ सप्पले. एस. सी. आर. ५६ - संदर्भित.**

**निर्णयविधि संदर्भ**

| | | |
|---|---|---|
| [२०००] ३ एस. सी. आर. १७२ मधील | परिच्छेद ३.५ | उल्लेखनीय |
| [२००१] २ एस. सी. आर. ४७१ मधील | परिच्छेद ३.७ | संदर्भित |
| [२०१४] १ एस. सी. आर. ५३८मधील | परिच्छेद ३.७ | संदर्भित |
| [२०१०] १३ एस. सी. आर. ५९९ मधील | परिच्छेद ३.७ | संदर्भित |
| [१९८०] २ एस. सी. आर. ९१३ मधील | परिच्छेद ३.७ | संदर्भित |

| | | |
|---|---|---|
| **(२०२२) १ एस. सी. सी. १०१ मधील** | **परिच्छेद ३.७** | **संदर्भित** |
| **[२००६] ३ एस. सी. आर. १०६८ मधील** | **परिच्छेद ४.६** | **वर अवलंबित** |
| **[२००३] ६ सप्ले. एस. सी. आर. ७६४ मधील** | **परिच्छेद ४.६** | **वर अवलंबित** |
| **[१९९६] ७ सप्ले. एस. सी. आर. ५६ मधील** | **परिच्छेद ४.६** | **संदर्भित** |
| **[२०१४] ४ एस. सी. आर. २७ मधील** | **परिच्छेद १३.१** | **उल्लेखनीय** |
| **[१९९७] १ एस. सी. आर. ८५० मधील** | **परिच्छेद १५** | **वर अवलंबित** |
| **[२००७] १० एस. सी. आर. ९३३ मधील** | **परिच्छेद १५.१** | **वर अवलंबित** |

अंतर्निहित अपीलीय अधिकारिता : विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र. १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ मधील अवमान याचिका (दि) क्र. ९४०/२०२१.

या न्यायालयाच्या दि. १७/०९/२०२१ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेश तसेच दि. २८/१०/२०२१ रोजी नंतर पारित करण्यात आलेल्या आदेशापासून आणि वाणिज्यिक लवाद याचिका क्र. ५५/२०१९ मधील प्रस्ताव सूचना क्र. ९६०/२०१९ मध्ये मुंबई येथील उच्च न्यायालयाने दि.०८/०८/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशापासून.

जयंत भूषण, वरिष्ठ अधिवक्ता, पुनीत सिंग बिंद्रा, नीरज कुमार, धीरज मेत्रे, सुश्री सिम्रान जीत, सत्यश्रीकांत वुथा, सनमप्रीत सिंग, सनी सचिन रावत, याचिकाकर्त्या तर्फे अधिवक्ता.

श्याम दिवान, वरिष्ठ अधिवक्ता, अशोक परांजपे, कुणाल वाजानी, कुणाल मिमानी, श्रेयस लेले, शुभांग टंडन, सुगंधा यादव, उत्तरवादी तर्फे अधिवक्ता.

न्यायालयाचा निर्णय यांच्याद्वारे देण्यात आला

**एम. आर. शाह, न्यायमूर्ती.**

१. प्रस्तुत अवमान याचिका यातील याचिकाकर्ता - अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर रिअल इस्टेट फंड- निवाडा धनको म्हणजेच ज्यांच्या बाजूने विद्वान लवाद यांनी निवाडा पारित केला आहे, ह्याने उत्तरवादींना या न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र. १४७२४/२०२१ मध्ये दि.१७/०९/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाचे आणि सदरच्या

विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र. १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ मध्ये दि. २८/१०/२०२१ रोजी पारित करण्यात आलेल्या त्यानंतरच्या आदेशाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा केल्याबद्दल न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ नुसार शिक्षा देण्यात यावी, या करीता दाखल केली आहे.

२. संबंधित पक्षांच्या तर्फे हजर असलेल्या विद्वान ज्येष्ठ अधिवक्तांनी सादर केलेले युक्तिवाद विचारात घेण्यापूर्वी, ही अवमान याचिका दाखल करण्यापर्यंतच्या कालक्रमानुसार तारखा आणि घटना यांचा संदर्भ देणे आणि त्यावर विचार करणे आवश्यक आहे, जे खालीलप्रमाणे आहेतः -

२.१ उत्तरवादी - अभिकथित अवमानकर्त्यांविरुद्ध यातील याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या लवाद कार्यवाहीमध्ये दि. ३०/०८/२०१८ रोजी पारित करण्यात आलेल्या लवाद निवाडयाद्वारे, विद्वान लवाद यांनी भाग खरेदी करारपत्राचे विनिर्दिष्ट पालन करण्याचा निवाडा दिला आणि असा निर्णय दिला कि याचिकाकर्ता हा रु. ७८,३३,३७,५०० एवढी रक्कम १८% द.स. दराने दि. २०/१२/२०१४ पासून वसूल होईपर्यंत व्याजासह वसूल करण्यास हक्कदार आहे.

२.२. विद्वान लवाद यांनी पारित केलेल्या निवाडयाला आव्हान देत, यातील उत्तरवादी यांनी लवाद आणि समेट अधिनियम, १९९६ (यापुढे '१९९६ चा अधिनियम' असा निर्देश आहे ) च्या कलम ३४ खाली उच्च न्यायालयासमोर वाणिज्यिक लवाद याचिका क्र. ५५/२०१९ दाखल केली. सदरच्या लवाद याचिकेत, यातील उत्तरवादी - मूळ अर्जदार यांनी निवाडयास स्थगिती देण्यास विनंती करण्याकरिता प्रस्ताव नोटीस क्र. ९६०/२०१९ काढला.

२.३ उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी, यातील उत्तरवादींनी निवाडा रकमेच्या ५० टक्के एवढी रक्कम बारा आठवड्यांच्या आत जमा करावी या अटीवर, प्रार्थना खंड 'अ' च्या अनुसार उक्त प्रस्ताव सूचना निकाली काढली. विद्वान एकल न्यायाधीशांनी असेही निरीक्षण नोंदवले की जर अशी जमा करावयाची रक्कम विहित केलेल्या मुदतीत जमा न केल्यास देण्यात आलेली अंतरिम स्थगिती हि प्रकरण न्यायालयासमक्ष पुढे संदर्भीत न करता रद्द होईल. त्याच वेळी, याचिकाकर्त्याला रक्कम जमा केल्याच्या एका आठवड्याच्या आत उत्तरवादी क्र. २ कंपनीत त्याने धारण केलेल्या

भागाच्या ५०% टक्के एवढी रक्कम जमा करण्याबद्दलचेही निर्देश देण्यात आले. विद्वान एकल न्यायाधीशांनी हे देखील स्पष्ट केले की जर उत्तरवादी-मूळ अर्जदारांनी निर्देश दिल्या प्रमाणे रक्कम अदा करण्यास कोणतेही कसूर केल्यास उत्तरवादी (यातील अर्जदार) यास असे भाग (शेअर्स) जमा करण्याची आवश्यकता नाही.

२.४. असे दिसते की निवाडयाला आव्हान देणारा १९९६ च्या अधिनियमाच्या कलम ३४ अंतर्गत अर्ज दाखल करण्यापूर्वीच, निवाडा धनको याने वाणिज्यिक दरखास्त अर्ज क्र.२९०८/२०१८ अन्वये उच्च न्यायालयासमक्ष दाखल केला होता. विद्वान एकल न्यायाधीशांनी दि. ०८/०८/२०१९ रोजीचा आदेश पारित केल्यानंतर, प्रस्ताव सूचना क्र. ९६०/२०१९ दाखल करण्यात आली होती. विद्वान एकल न्यायाधीश यांनी अंमलबजावणी न्यायालय म्हणून निवाडा धनको याने काढलेल्या चेंबर समन्स क्र. ३५७/२०१९ मध्ये दि. १८/११/२०१९ रोजी हा आदेश पारित केला.विद्वान एकल न्यायाधीशांनी दि. १८/११/२०१९ च्या आदेशानुसार यातील उत्तरवादीला दि. १८/११/२०१९ च्या आदेशानुसार त्यांची मालमत्ता जाहीर करणारे प्रकटीकरण प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले. तथापि, दि. १८/११/२०१९ रोजीच्या आदेशाचे उत्तरवादींनी पालन केले नाही आणि वारंवार मुदतवाढ मागितली.

२.५. यादरम्यान, यातील उत्तरवादींनी दि. ०८/०८/२०१९ च्या आदेशाला आव्हान देणारे वाणिज्य अपील क्र. ५२१/२०१९ दाखल केली, ज्यामध्ये, उच्च न्यायालयाने विद्वान लवाद यांनी दिलेल्या निवाडयाला स्थगिती देताना, त्यांना निवाडा रक्कमेच्या ५०% एवढी रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले. येथे नोंद घेणे आवश्यक आहे की वाणिज्य अपील क्र. ५२१/२०१९ प्रलंबित असतांना, यातील उत्तरवादींनी, म्हणजेच उच्च न्यायालयासमोरील अवमानकर्ते - अपीलकर्ते यांनी दि. ०८/०८/२०१९ रोजीच्या आदेशानव्ये विद्वान एकल न्यायाधीशांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे रक्कम जमा करण्यासाठी अनेक वेळा मुदतवाढ मिळण्याकरीता प्रार्थना केली होती.

२.६. उपरोक्त अपील, दि. २९/०७/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार टिकून राहण्यायोग्य नसल्याने खारीज करण्यात आली आणि अंतरिम अर्ज सुद्धा निकाली काढण्यात आला. त्या आदेशाने व्यथित होऊन, यातील उत्तरवादींनी प्रस्ताव नोटीस क्र. ९६०/२०१९ यामधील आणि वाणिज्य लवाद याचिका क्र. ५५/२०१९ यामधील

दि.०८/०८/२०१९ रोजीच्या आदेशाला आव्हान देणारी विशेष अनुज्ञा याचिका या न्यायालयासमक्ष दाखल केली. दि. १७/०९/२०२१ च्या आदेशानव्ये, या न्यायालयाने गुणावगुणावरून उक्त विशेष अनुज्ञा याचिका खारीज केली. तथापि, यातील उत्तरवादी - याचिकाकर्ते यांच्या वतीने या न्यायालयासमक्ष दि. ०८/०८/२०१९ रोजीच्या पारित आदेशाचे पालन करण्यासत्व दि. १७/०९/२०२१ पासून आणखी आठ आठवड्यांची मुदत देण्यात यावी, ज्याद्वारे ते लवाद यांनी निवाडा केलेल्या रकमेच्या ५०% एवढी रक्कम जमा करू शकतील, अशी प्रार्थना करण्यात आली. दि. १७/०९/२०२१ रोजीचा आदेश हा एकतर्फी व विशेष अनुज्ञा याचिकेतील अर्जदार- यातील उत्तरवादींना नोटीस न देता पारीत करण्यात आलेला असल्याने, यातील अर्जदाराने दि. १७/०९/२०२१ रोजीचा आदेश ज्याद्वारे उत्तरवादींना - या न्यायालयासमोरील याचिकाकर्त्यांना आणखी आठ आठवड्यांची मुदत देण्यात आली होती, रद्द करण्यासाठी संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ दाखल करण्यात आला होता.

२.७. अर्जदारांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की उत्तरवादींचा आदेशाचे पालन करण्याचा आणि विद्वान लवाद यांनी दिलेल्या निवाडयातील रकमेच्या ५०% एवढी रक्कम जमा करण्याचा कोणताही हेतू नाही आणि आणखी आठ आठवड्यांची मुदत हि केवळ, वेळ वाया घालवण्यासाठी मागितली आहे कारण रक्कम जमा करण्याचा आणि/किंवा उच्च न्यायालयाने दि. ०८/०८/२०१९ रोजीच्या आदेशाचे पालन करण्याचा कोणताही उद्देश नाही.

२.८. उत्तरवादींतर्फे अधिवक्तांसह संबंधित पक्षांतर्फे हजर झालेल्या विद्वान अधिवक्तांचे म्हणणे ऐकल्यानंतर, या न्यायालयाने संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१, ज्यातील आदेशाचे सुद्धा पालन न केल्याचे अभिकथित केले आहे, यामध्ये दि. २८/१०/२०२१ रोजी आदेश पारित केला. दि. २८/१०/२०२१ च्या आदेश अन्व्ये, या न्यायालयाने यातील उत्तरवादींना - विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र . १४७२४/२०२१ मधील या न्यायालयासमोरील याचिकाकर्त्यांना आदेश पालन करण्याचे आणि सकारात्मकपणे उच्च न्यायालयाने दि. ०८/०८/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार जमा करावयाची रक्कम जमा करण्याचे आणि या न्यायालयाने दिलेल्या मुदतीच्या (आठ आठवड्याच्या) आत जमा करण्याचे निर्देश दिले होते. या न्यायालयाने पुढे असेही

निरीक्षण नोंदवले की त्याचे पालन न करणे हि बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची मानण्यात येईल आणि आक्षेपित आदेशात उच्च न्यायालयाने निर्देश दिल्याप्रमाणे रक्कम जमा करण्यात कसूर केल्यास या न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन न केल्याचे मानण्यात येईल आणि गंभीर परिणाम देखील होऊ शकतील.

२.९. या न्यायालयाने विनिर्दिष्ट निर्देश दिले होते असे असून देखील, उत्तरवादींनी उच्च न्यायालयाद्वारे दि. ०८/०८/२०१९ रोजी पारीत आदेशाचे अनुपालन केले नाही शिवाय विशेष अनुज्ञा याचिका क्र. १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ मध्ये दि. २८/१०/२०२१ रोजी या न्यायालयाने पारित आदेशाचे देखील अनुपालन केले नाही.

२.१०. यातील अर्जदाराने उत्तरवादींना दि. १६/११/२०२१ रोजी कायदेशीर नोटीस बजावली, ज्याद्वारे उत्तरवादींना उच्च न्यायालयाद्वारे दि. ०८/०८/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे तसेच या न्यायालयाने दि. १७/०९/२०२१ आणि दि. २८/१०/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशांचे पालन करण्यास फर्मावण्यात आले होते. उपरोक्त कायदेशीर नोटीस मध्ये, असे विनिर्दिष्टपुर्वक नमूद करण्यात आले होते की जर उपरोक्त आदेशांचे पालन करण्यात आले नाही, तर याचिकाकर्त्यांना न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे बुद्धिपुरस्सर अवज्ञा केल्याबद्दल योग्य कार्यवाही सुरू करण्यासाठी, पुढे जाणे भाग पडेल. विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र. १४७२४/२०२१ मध्ये या न्यायालयाने दि. ०८/०८/२०१९ रोजी पारीत आदेशाचे पालन करण्यासाठी दिलेली मुदत संपली असल्याचे सूचित करणारी आणखी एक कायदेशीर नोटीस उत्तरवादींना बजावण्यात आली होती. वरीलप्रमाणे असून देखील, उच्च न्यायालयाद्वारा दि. ०८/०८/२०१९ रोजी पारीत आदेशाचे तसेच या न्यायालयाने दि.१७/०९/२०२१ आणि दि. २८/१०/२०२१रोजी पारीत केलेल्या आदेशांचे पालन करण्यात आले नाही. त्याऐवजी, दि. २८/१०/२०२१ रोजी पारीत केलेल्या आदेशाचे अनुपालन न केल्याने गंभीर परिणाम होऊ शकतात याची जाणीव झाल्यानंतर देखील, यातील उत्तरवादींनी संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ मध्ये या न्यायालयाने दि. २८/१०/२०२१ रोजी पारीत केलेला आदेश रद्द करण्याची विनंती करणारा संकीर्ण अर्ज क्र. ६१/२०२२ दि. १७/०१/२०२२ रोजी दाखल केला.

२.११. दि. २५/०१/२०२२ रोजी तपशीलवार आदेशाद्वारे, या न्यायालयाने सदर अर्ज ज्याद्वारे यातील उत्तरवादींनी संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ मध्ये दि. २८/१०/२०२१ रोजी पारित केलेला आदेश रद्द करण्याची विनंती केली होती, खारीज केला होता.

२.१२. या टप्प्यावर, याची नोंद घेणे आवश्यक आहे की संकीर्ण अर्ज क्र.६१/२०२२ मध्ये या न्यायालयासमक्ष उत्तरवादींतर्फे -अर्जदार तर्फे हजर असलेल्या विद्वान अधिवक्ता यांनी या न्यायालयाने जारी केलेल्या निदेशांवर दि. २८/१०/२०२१ रोजी च्या आदेशानव्ये अनेक सादर निवेदने केलीत, जी प्रस्तुत कार्यवाहीत या न्यायालयासमक्ष उत्तरवादीं तर्फे हजर असलेल्या विद्वान अधिवक्तांनि पुन्हा सादर केली आहेत आणि संकीर्ण अर्ज क्र. ६१/२०२२ वर निर्णय देताना या न्यायालयाने सर्व सादर निवेदनांचा परामर्श घेतला होता.

२.१३. या टप्प्यावर, ह्याची नोंद घेणे आवश्यक आहे की संकीर्ण अर्ज क्र. ६१/२०२२ दाखल करण्यापूर्वी, याचिकाकर्त्यांनी, संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ मध्ये दि. २८/१०/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशाची अवज्ञा झाल्याचे अभिकथन करणारा प्रस्तुतचा अर्ज अगोदरच दाखल केला होता, जो दि. १८/११/२०२१ रोजी दाखल करण्यात आला होता, ज्यामध्ये या न्यायालयाने दि. १०/१२/२०२१ रोजीच्या आदेशाद्वारे उत्तरवादींना नोटीस जारी करून दि. १०/०१/२०२२ रोजी परत मागविण्याचे निर्देश दिले होते आणि प्रस्तुत अवमान याचिकांमध्ये या न्यायालयाची नोटिस बजावण्यात आल्याने उत्तरवादि यांनी पूर्वोक्त संकीर्ण अर्ज क्र. ६१/२०२२ दाखल करून दि. २८/१०/२०२१ रोजीचा आदेश जो वर म्हटल्याप्रमाणे दि.२५/०१/२०२२ रोजीच्या आदेशान्व्ये या न्यायालयाने आधीच खारीज केला आहे, तो आदेश रद्द करण्यासाठी प्रार्थना केली आहे. आली आहे.

३. उत्तरवादी - अभिकथित अवमानकर्त्यां तर्फे हजर असलेले विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्याम दिवान यांनी संकीर्ण अर्ज क्र. ६१/२०२२ निकाली काढताना पूर्वी जे सादर निवेदन करण्यात आले होते, त्याचा पुनरुच्चार केला आहे.

३.१. विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री. दिवान यांनी सादर निवेदन केले आहे की या न्यायालयाने अशा प्रकारे कोणतेही निर्देश जारी केलेले नाहीत ज्यांचे पालन न केल्याचे

अभिकथन केले आहे. याबद्दल सविस्तर माहिती देताना त्यांनी सादर निवेदन केले की दि. १७/०९/२०२१ रोजी च्या आदेशाद्वारे, या न्यायालयाने उत्तरवादींनी दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका खारीज करताना विद्वान एकल न्यायाधीशांनी पारित केलेल्या दि. ०८/०८/२०१९ रोजीच्या आदेशाचे पालन करण्यासाठी वेळ वाढवून दिला. असे सादर निवेदन केले आहे की दि. ०८/०८/२०१९ रोजी चा उक्त आदेश प्रस्ताव नोटीस वर दिलेला अंतरिम आदेश होता, ज्याद्वारे विद्वान लवाद याने पारित केलेल्या निवाडयाला स्थगिती देताना उत्तरवादींना निवाडयातील रकमेच्या ५०% रक्कम जमा करण्याचे निदेश देण्यात आले होते. असे सादर निवेदन केले आहे की दि. ०८/०८/२०१९ रोजीच्या आदेशातच, विद्वान एकल न्यायाधीशांनी विनिर्दिष्टपुर्वक असे निरीक्षण नोंदवले आहे की त्याचे अनुपालन न केल्यास, देण्यात आलेली अंतरिम स्थगिती रद्द होईल. असा युक्तिवाद केला आहे की निवडयाने दिलेल्या रकमेच्या ५० % एवढी रक्कम निर्धारित केलेल्या अवधि आणि वाढवून दिलेल्या कालावधीत जमा न केल्यास, विद्वान लवाद यांनी दिलेल्या निवाडयाची कोणतीही स्थगिती राहणार नाही आणि त्यामुळे सदरचा निवाडा अंमलबजावणी योग्य असेल आणि दरखास्त कार्यवाहीची सुनावणी होणे आणि कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे आग्रहाची विनंती केली की दि. ०८/०८/२०१९ रोजीच्या आदेशाचे अनुपालन न केल्याने न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ अंतर्गत कोणत्याही कार्यवाहीची करण्याचे समर्थन करणारी पुरेशी कारणे नाही, कारण दिनांक ०८/०८/२०१९ रोजीच्या आदेशास निवडयाने दिलेल्या रकमेच्या ५०% रक्कम जमा करण्याचे अनिवार्य आदेश किंवा निर्देश असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही. असेही सादर निवेदन करण्यात आले कि दि. १७/०९/२०२१ रोजी पारीत आदेश हा या न्यायालयाने दिलेला कोणताही आदेश किंवा निर्देश असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.

३.२. लवाद न्यायाधिकरणाने निवाडयाने दिलेली रक्कम जमा न केल्यास, निवाडा अंमलबजावणीयोग्य होतो, अश्या विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री. दिवान यांनी सादर केलेल्या निवेदनाच्या समर्थनार्थ त्यांनी आम्हाला १९९६ च्या अधिनियमाच्या कलम ३६ चा संदर्भ दिला. असे सादर निवेदन करण्यात आले की, अशा प्रकारे दरखास्त अर्ज आधीच दाखल करण्यात आला असून तो प्रलंबित आहे.

३.३. पुढे असे सादर निवेदन करण्यात आले आहे कि जेव्हा याचिकाकर्त्याने या

न्यायालयाद्वारे दि. १७/०९/२०२१ रोजी पारीत आदेश रद्द करण्याची विनंती करणारा, संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ दाखल केला तेव्हा याचिकाकर्त्यानेही रक्कम जमा करण्याची अटीचा रक्कम जमा करण्यासंदर्भात अनिवार्य निर्देश असल्याबद्दल अनव्यार्थ लावला नाही.

३.४. उत्तरवादीं तर्फे हजर झालेले विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री दिवान यांनी पुढे सादर केले आहे की, दि. १७/०९/२०२१ रोजी पारीत करण्यात आलेला आदेश हा उत्तरवादींना रक्कमेपैकी ५०% एवढी रक्कम जमा करण्याचे निर्देश देणारा अनिवार्य आदेश नव्हता आणि दि. १७/०९/२०२१ रोजी पारीत केलेला आदेश हा विद्वान एकल न्यायाधीशांनी दिलेल्या आदेशानुसार रक्कम जमा करण्यासाठी उत्तरवादींच्या बाजूने मुदत वाढवून देणारा आदेश होता. दि.१७/०९/२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्यासाठी, याचिकाकर्त्याने दाखल केलेल्या अर्जावर पारित केलेल्या दि. २८/१०/२०२१ रोजीचा नंतरचा आदेश हा देखील अनिवार्य आदेश, ज्याचे अनुपालन न केल्यास न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ अंतर्गत कोणत्याही कार्यवाहि समर्थनीय होईल, असा अनिवार्य आदेश आणि/किंवा निर्देश असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.

३.५. उत्तरवादीं तर्फे हजर असलेले विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री. दिवान यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, विद्वान एकल न्यायाधीशांनी दि. ०८/०८/२०१९ रोजी पारीत केलेल्या आदेशाचे पालन न केल्याने, ज्याद्वारे रक्कमेच्या ५०% एवढी रक्कम जमा न केल्यावर देण्यात आलेली अंतरिम स्थगिती रद्द झाली होती आणि म्हणूनच, हया निवाडयाची अंमलबजावणी करायची आहे, ज्याकरीता दरखास्त कार्यवाही प्रलंबित असून याचिकाकर्त्याला न्यायालयीन अवमान कार्यवाही हा उपाय उपलब्ध नाही. **आर. एन. डे आणि इतर -विरुद्ध- भाग्यबती प्रामाणिक आणि इतर, (२०००) ४ एस. सी. सी. ४००** या प्रकरणात या न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार असे सादर निवेदन केले आहे कि, अवमान कार्रवाहीचे शस्त्र, हे हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याच्या किंवा ज्या आदेशासाठी कायद्याने उचित कार्यपद्धतीची तरतूद केली आहे अशा आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने वापरले जाऊ शकत नाही.

३.६. उत्तरवादीं तर्फे हजर असलेले विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री. दिवान यांनी असा युक्तिवाद केला आहे की अशा प्रकारे या न्यायालयाद्वारे आणि/किंवा उच्च

न्यायालयाद्वारे पारीत करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा करण्यात आली नाही. खरे तर, उत्तरवादींनी रक्कम जमा करण्याच्या अटीचे पालन करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. तथापि, या माननीय न्यायालयाने दिलेल्या आठ आठवड्यांच्या कालावधीत सर्वोत्तम प्रयत्न करूनही, उत्तरवादींना भेडसावणारी गंभीर आणि असह्य आव्हाने/अडचणी लक्षात घेऊन उत्तरवादींना रक्कम जमा कारण्याच्या अटींचे अनुपालन करता आले नाही.

३.७. पुढे असे सादर निवेदन केले आहे की हा वाद वाणिज्य वादाच्या स्वरूपातील असून वाटाघाटी सुरू आहेत आणि रक्कमेचा अंतिम आकडा निश्चित करावयाचा आहे. उत्तरवादींनी त्यांची प्रामाणिकपणा दाखवण्यासाठी आधीच ५ कोटी रक्कमेचा दर्शनी धनाकर्ष दिला असून उच्च न्यायालयाच्या निबंधणी कडे आणख ५ कोटी एवढी रक्कम जमा करण्यास तयार आहेत. असे सादर निवेदन करण्यात आले कि, त्यामुळे जेव्हा बुद्धिपुरस्सर अवज्ञा करण्यात आलेली नाही, तेव्हा प्रस्तुत अवमान कार्यवाही खारीज करण्यात यावी. **मृत्युंजय दास आणि अन्य - विरुद्ध - सय्यद हसीबुर रहमान आणि अन्य, (२००१) ३ एस. सी. सी. ७३९** (परिच्छेद १३ आणि १४); **राम किशन - विरुद्ध - तरुण बजाज आणि इतर , (२०१४) १६ एस. सी. सी. २०४** (परिच्छेद ११ ते १५); **दिनेश कुमार गुप्ता - विरुद्ध - युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आणि इतर, (२०१०) १२ एस. सी. सी. ७७०** (परिच्छेद १७); **जॉली जॉर्ज वर्गीस आणि अन्य - विरूढ - द बँक ऑफ कोचीन, (१९८०) २ एस. सी. सी. ३६०** (परिच्छेद १, २, ४, ६, १० आणि ११); आणि **डॉ. यू. एन. बोरा, माजी. मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर. वि. आसाम रोलर फ्लोअर मिल्स असोसिएशन आणि अन्य (२०२२) १ एस. सी. सी. १०१** (परिच्छेद ८ आणि ९) या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयांवर विसंबून राहण्यात आले.

४. याचिकाकर्त्या तर्फे बाजू मांडणारे ज्येष्ठ अधिवक्ता जयंत भूषण यांनी सादर निवेदन केले आहे की, उत्तरवादींना आजरोजी एकूण १९० कोटी एवढी रक्कम, विद्वान लवाद ह्यांनी दिलेल्या निवाडयानुसार, जो चार वर्षांपूर्वी पारीत करण्यात आला होता, त्यानुसार थकीत असून देय आहे.

४.१. विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री भूषण यांनी सादर निवेदन केले आहे की

याचिकाकर्त्याने दरखास्त कार्यवाही दाखल केल्यापासून, प्रत्येक टप्प्यावर, उत्तरवादींनी प्रस्ताव सूचना दाखल करून आणि निवाडा रकमेच्या ५०% रक्कम जमा करण्याच्या अटीवर निवाडयावर अंतरिम स्थगिती मिळवून आणि त्यानंतर अपील प्रलंबित असतानाही मुदतवाढ मिळवून न्यायालयाला विश्वास देण्यात आला की ते विद्वान एकल न्यायाधीशांनी दि.०८/०८/२०१९ रोजी च्या आदेशानुसार रक्कम जमा करतील, अशा एक ना दुसऱ्या कारणावरून निवाडयाची अंमलबजावणी करण्यामध्ये विलंब केलेला आहे. असे सादर निवेदन केले आहे की या संपूर्ण कालावधी दरम्यान, उत्तरवादींनी त्यांनी मागितलेल्या मुदतवाढीचा फायदा घेतला आहे. असे सादर निवेदन करण्यात आले आहे की त्यामुळे आता उत्तरवादींना असे म्हणण्याची मुभा राहणार नाही की विद्वान एकल न्यायाधीश यांनी दि. ०८/०८/२०१९ रोजी च्या आदेशान्वये रक्कमेच्या ५०% एवढी रक्कम जमा न केल्यास, सदरचा निवाडा अंमलबजावणीयोग्य आहे.

४.२. याचिकाकर्त्या तर्फे हजर असलेले ज्येष्ठ अधिवक्ता श्री जयंत भूषण यांनी सादर निवेदन केले आहे की, याचिकाकर्त्याने घेतलेल्या चेंबर समन्समध्ये उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे, ज्याद्वारे उत्तरवादींना त्यांची मालमत्ता जाहीर करण्याचे निर्देश देण्यात आले होते त्याचे अनुपालन उत्तरवादींनीही केले नाही. असे सादर निवेदन केले आहे कि, उच्च न्यायालयाने अनेक संधी दिल्या तरीहि, उत्तरवादींनी उच्च न्यायालयाद्वारे जारी केलेल्या निर्देशांचे, ज्याद्वारे उत्तरवादींना त्यांची मालमत्ता उघड करण्याचे निर्देश देण्यात आले होते, त्याचे त्यांनी अनुपालन केले नाही, त्यांनी जवळजवळ अडीच वर्षांच्या कालावधीनंतर आपली मालमत्ता जाहीर केली. त्यामुळे असे सादर निवेदन करण्यात आले की उत्तरवादींच्या संपूर्ण वर्तणूकातून असे सूचित होते की त्यांना न्यायालयाने (न्यायालयांनी) पारित केलेल्या आदेशांचे/ निदेशांचे अनुपालन न करण्याची सवयच आहे.

४.३. याचिकाकर्त्या तर्फे हजर असलेले विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री जयंत भूषण यांनी असेही सादर निवेदन केले आहे की संकीर्ण अर्ज क्र. ६१/२०२२ हा जरी खारीज करण्यात आला असला तरी, आता असे म्हणण्याचे उत्तरवादींचा हा फाझील धीटपणा आहे की दि. २८/१०/२०२१ रोजीच्या आदेशास अनिवार्य निदेश असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही. त्यांनी आमचे लक्ष संकीर्ण अर्ज क्र. ६१/२०२२ मधील प्रकथनांकडे वेधले,

ज्यामध्ये त्याच उत्तरवादींनी म्हटले आहे की दि. २८/१०/२०२१ रोजीचा आदेश हा एक अनिवार्य आदेश/निदेश आहे. असे सादर निवेदन करण्यात आले कि, उत्तरवादींनीच्या अश्या भूमिकेने त्यांचे शिरजोर वर्तन चिघळले आहे.

४.४. आता, जोपर्यंत उत्तरवादितर्फे करण्यात आलेले सादर निवेदन कि विद्वान एकल न्यायाधीशांनी पारित केलेला आदेश आणि त्यानंतरचा दि. १७/०९/२०२१ रोजी या माननीय न्यायालयाद्वारे पारित केलेला आदेश हे निदेश असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही आणि जर त्याचे अनुपालन झाले नाही, तर १९९६ च्या अधिनियमाच्या कलम ३६ अंतर्गत परिणाम होतील आणि त्यानंतर निवाडयाची अंमलबजावणी करावी लागेल, या संदर्भात याचिकाकर्त्याच्या वतीने हजर असलेले विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री जयंत भूषण यांनी कडकडून असे सादर निवेदन केले आहे की, अभिकथित अपालन हे केवळ उच्च न्यायालयाच्या विद्वान एकल न्यायाधीशांनी दि. ०८/०८/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे आणि या माननीय न्यायालयाद्वारे दि. १७/०९/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशासाठी करण्यात आले आहे असे नसून, अभिकथित आपलन दि. २८/१०/२०२१ रोजीच्या आदेशाचे सुद्धा करण्यात आले आहे, ज्याद्वारे, या न्यायालयाने उत्तरवादी यांना विद्वान एकल न्यायधीश यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे रक्कम जमा करण्याचे विनिर्दिष्ट अनिवार्य निदेश दिले होते. असे सादर निवेदन करण्यात आले आहे कि, निदेशांचे पालन न केल्यास गंभीर परिणाम होतील, असे या आदेशातच स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. असे सादर निवेदन करण्यात आले आहे की असे असूनही, उतरवादींनी दि. ०८/०८/२०१९ रोजी विद्वान एकल न्यायाधीश यांनी पारित केलेल्या आदेशानुसा रक्कम अदा केलेली नाही.

४.५. आता, उत्तरवादितर्फे बुद्धिपुरस्सर कोणतीही अवज्ञा करण्यात आली नसून त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न करूनही, आर्थिक संकट आणि इतर प्रतिकूल परिस्थितींमुळे आदेशान्व्ये रक्कम अदा करण्याच्या स्थितीत नाहीत, करण्यात आलेले सादर निवेदनाच्या संबंधात, याचिकाकर्त्या तर्फे हजर झालेले विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री. जयंत भूषण यांनी कडकडून सादर केले की, आता घेतलेली उपरोक्त भूमिका पश्चात बुद्धी आहे कारण जेव्हा संकीर्ण अर्ज क्र. ६१/२०२२ हा दाखल करण्यात आलेला होता तरीही, उत्तरवादींच्या वतीने असे कधीच सादर करण्यात आले नव्हते की आर्थिक अडचणी

आणि/किंवा प्रतिकूल परिस्थितीमुळे ते रक्कम जमा करण्याच्या स्थितीत नाहीत. असे सादर निवेदन करण्यात आले आहे की उत्तरवादी देखील ५०० कोटी किमतीचे विकास अधिकार विकू शकतात आणि त्यांच्याकडे ती आर्थिक क्षमता आहे परंतु त्यांनी बुद्धिपुरस्सर या न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केले आहे.

४.६. वरील प्रमाणे सादर निवेदने करीत आणि **रमा नारंग - विरुद्ध - रमेश नारंग आणि अन्य (२००६) ११ एस. सी. सी. ११४** (परिच्छेद २४, २५, ३० आणि ३२)**; बँक ऑफ बडोदा - विरुद्ध - सद्रुद्दीन हसन दया आणि अन्य (२००४) १ एस. सी. सी. ३६०** (परिच्छेद १२ आणि १४)**; आणि रीटा मार्कंडेय - विरुद्ध - सुरजित सिंग अरोरा (१९९६) ६ एस. सी. सी. १४** (परिच्छेद १२) या प्रकरणातील या न्यायालयाद्वारे दिलेल्या निर्णयांवर विसंबून अशी प्रार्थना करण्यात येते कि, दि. २८/१०/२०२१ रोजी च्या आदेशानव्ये या न्यायालयाने जरी केलेल्या निदेशाची हेतुपुरस्पर अवज्ञा केल्याबद्दल उत्तरवादी क्र. १ यांस शिक्षा करण्यात यावी.

५. संबंधित पक्षांचे विद्वान ज्येष्ठ अधिवक्तांचे सविस्तर म्हणणे ऐकले.

६. प्रस्तुत याचिकेत, अशी प्रार्थना करण्यात आली आहे कि, या न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र. १४७२४/२०२१ मध्ये दि. १७/०९/२०२१ रोजी पारित आदेशाचे आणि विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र. १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्र. १६६८/२०२१ मध्ये दि. २८/१०/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशा ची सुद्धा बुद्धिपुरस्सर अवज्ञा केल्यासाठी उत्तरवादींना न्यायालय अवमान अधिनियमाच्या तरतुदींनुसार शिक्षा करण्यात यावी. तात्काळ संदर्भासाठी उक्त आदेश खालीलप्रमाणे उदधृत करण्यात आले आहेत :

**<u>आदेश दि. १७/०९/२०२१</u>**

" विलंबासाठी माफ करण्यात येते.

याचिकाकर्त्यां तर्फे बाजू मांडणारे ज्येष्ठ अधिवक्ता श्री श्याम दिवान यांचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपीत आदेश प्रस्ताव सूचना अर्ज मधील असून, अंतरिम आदेश आहे या वस्तुस्थितीचा विचार करून, आम्हाला आक्षेपीत आदेशात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण दिसत नाही.

विशेष अनुज्ञा याचिका फेटाळण्यात येते.

प्रलंबित असलेले अर्ज, असल्यास निकाली काढण्यात येतील.

तथापि, प्रार्थना केल्याप्रमाणे, आम्ही अर्जदारांना उच्च न्यायालयाने दिलेल्या आक्षेपीत आदेशाचे अनुपालन करण्यासाठी आजपासून आणखी आठ आठवड्यांची मुदत देतो.

**<u>आदेश दि. २८/१०/२०२१</u>**

" न्यायालयासमक्ष यातील उत्तरवादी क्र. १ अर्जदार - अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर रिअल इस्टेट फंड तर्फे हजर झालेले विद्वान ज्येष्ठ अधिवक्ता श्री. जयंत भूषण आणि मूळ याचिकाकर्ते यांच्या तर्फे हजर झालेले विद्वान अधिवक्ता श्री कुणाल वजानी यांचे म्हणणे ऐकल्यावर, वि. अ. या. (दि ) क्र. १४७२४/२०२१ मधील याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आक्षेपीत आदेशानुसार अदा करावयाची रक्कम सकारात्मकपणे आणि या न्यायालयाने दिलेल्या वेळेच्या आत अदा करावी लागेल आणि त्याचे पालन न करणे अत्यंत गंभीर मानले जाईल आणि आक्षेपीत आदेशात उच्च न्यायालयाने निदेश दिल्याप्रमाणे रक्कम अदा न करणे हे देखील आमच्या आदेशाचे पालन न करणे म्हणून मानले जाईल, ज्याचे गंभीर परिणाम होतील या निरीक्षणासह आम्ही सध्याच्या अर्ज निकाली काढत आहोत.

यासोबतच, सध्याचा अर्ज निकाली काढण्यात आला आहे."

७. उत्तरवादींच्या - कथित अवमानकर्त्यांच्या वतीने म्हणण्यानुसार, या माननीय न्यायालयाद्वारे विशेष अनुज्ञा याचिका (दि) क्र. १४७२४/२०२१ मध्ये दि. १७/०९/२०२१ रोजी दिलेल्या आदेशाद्वारे, ही विशेष अनुज्ञा याचिका खारीज करताना, या न्यायालयाने मूळ अर्जदारांना उच्च न्यायालयाद्वारे दि. ०८/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन करण्यासाठी आणखी आठ आठवड्यांची मुदत दिली तसेच, उच्च न्यायालयाने मूळ अर्जदारांच्या - यातील उत्तरवादींच्या बाजूने सशर्त स्थगिती आदेश पारित केला कि त्यांनी निवाडा रक्कमेची ५०% एवढी रक्कम जमा करावी, तसे करण्यास कसूर केल्यास स्थगिती रद्द होईल. उत्तरवादींच्या वतीने असे म्हणणे आहे की दि. ०८/०८/२०१९ च्या आदेशाचे पालन न केल्यास, १९९६ च्या अधिनियमाच्या कलम ३६ अंतर्गत आवश्यक परिणाम

होतील आणि निवाडयाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यवाही पुढे सुरु ठेवावी लागेल. त्यामुळे असे सादर निवेदन करण्यात आले आहे की, दि. ०८/०८/२०१९ रोजीचा आदेश हा एक निर्देश असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही आणि अर्जदारांना अंमलबजावणीच्या कार्यवाहीसह पुढे जाण्यासाठी उपलब्ध असलेला उपाय लक्षात घेता, दि. ०८/०८/२०१९ रोजी च्या आदेशाचे आणि/किंवा विशेष अनुज्ञा याचिका (दि ) क्र. १४७२४/२०२१ मधील दि. १७/०९/२०२१ रोजी या न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अवज्ञा केल्याबद्दल न्यायालय अवमान अधिनियमांतर्गत कोणतीही कार्यवाही टिकून राहण्यायोग्य नाही. प्रकरणाची तथ्ये आणि परिस्थिती पाहता आणि उत्तरवादींच्या वर्तनाचा विचार करता, हे सादर निवेदन स्वीकारले जाऊ शकत नाही.

८. हे लक्षात घेण्यासारखे आहे की दि. ३०/०८/२०१८ रोजीचा निवाडा अर्जदाराच्या बाजूने आहे आणि विद्वान लवाद यांनी भाग खरेदी करारपत्राचे विनिर्दीष्ट पालन करण्याचा निवाडा दिला आणि असा निर्णय दिला कि, अर्जदार हा रु. ७८,३३,३७,५००/- एवढी रक्कम १८% दर साल दराने दि. २०/१२/२०१४ पासून वसूल होईपर्यंत व्याजासह वसूल करण्यास हक्कदार आहे आणि उत्तरवादी कंपनी विरूद्ध रु. ५० लाख ची रक्कम सुद्धा प्रदान केली होती. त्यानंतर निवाडा धनकोने दि. १०/१२/०२०१८रोजी अंमलबजावणी याचिका दाखल केली होती आणि तेव्हापासून, उत्तरवादींनी एकामागून एक कार्यवाही सुरू करून आणि वाणिज्य लवाद याचिका क्र. ५५/२०१९ मधील आणि प्रस्ताव नोटीस क्र. ९६०/२०१९ मध्ये उच्च न्यायालयाद्वारा दि. ०८/०८/२०१९ रोजी च्या अंतरिम आदेशाला मुदतवाढ मिळवून आजपर्यंत निवाडयाची अंमलबजावणी यशस्वीरित्या टाळली आहे. दि. ०८/०८/२०१९ रोजीच्या आदेशानंतर, उत्तरवादींनी अनेक मुदतवाढींची मागणी केली, जी उच्च न्यायालयाने या विश्वासाने मंजूर केली की उत्तरवादी दि. ०८/०८/२०१९च्या आदेशानुसार रक्कम जमा करतील. अशा प्रकारे, उत्तरवादींनी न्यायालयाने दिलेल्या मुदतवाढीचा लाभ घेतला आणि उत्तरवादींना दि. ०८/०८/२०१९ च्या आदेशानुसार रक्कम जमा करण्यासाठी त्यांच्या विनंतीनुसार मुदतवाढ देण्यात आली होती.

जवळपास दोन वर्षे आणि त्याहून अधिक कालावधीसाठी मुदतवाढीचा लाभ घेतल्यानंतर, उत्तरवादींना असा युक्तिवाद करण्यास मोकळीक नाही की त्यांनी दि.

०८/०८/२०१९ च्या आदेशानुसार रक्कम जमा केलेली नसल्यामुळे, १९९६ च्या अधिनियमाच्या कलम ३६ अंतर्गत आवश्यक परिणाम होतील आणि अंमलबजावणीची कार्यवाही सुरु करावी लागेल. वर निरीक्षण केल्याप्रमाणे, दि. ०८/०८/२०१९ चा अंतरिम आदेश आणि उत्तरवादींच्या विनंतीवरून उच्च न्यायालयाने दिलेली त्यानंतरची मुदतवाढ, या पार्श्वभूमीवर, अंमलबजावणीच्या कार्यवाहीला विलंब झाला आहे. यातील उत्तरवादींना दि. ०८/०८५/२०१९ च्या आदेशानुसार रक्कम जमा करण्यासाठी मुदतवाढीचा लाभ मिळाला आहे, परिणामी त्यांनी दोन वर्षांहून अधिक काळाकरीता अंमलबजावणीच्या प्रक्रियेत यशस्वीरित्या अडथळा आणला आहे. असे केल्यामुळे, उत्तरवादींना आता असा युक्तिवाद करण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही की उच्च न्यायालयाने दि. ०८/०८/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन करण्यासाठी कोणतेही अनिवार्य निदेश नव्हते. उत्तरवादींचे असे वर्तन हे कायद्याच्या प्रक्रियेचा तसेच न्यायालयाचा दुरुपयोग आहे, ज्याबद्दल तीव्र नापसंती दर्शविण्यात येत आहे. या टप्प्यावर, नोंद घेणे आवश्यक आहे की उत्तरवादींना त्यांची मालमत्ता घोषित करण्याचे निर्देश देणाऱ्या चेंबर समन्समध्ये उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन देखील सुमारे दोन वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आले नव्हते. यायातून उच्च न्यायालयाद्वारे दिलेल्या आदेशांकडे दुर्लक्ष करण्याचा आणि त्यांचा अनादर करण्याचा, उत्तरवादींचा उद्देश आणि त्यांची वर्तणूक दर्शविते.

९. अन्यथा सुद्धा, अशी नोंद घेणे आवश्यक आहे की, दिनांक २८.१०.२०२१ रोजी या न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र. १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये पारित केलेल्या आदेशाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा केल्याचे आणि/किंवा त्याचे अनुपालन न केल्याचे अभिकथन केले आहे, जो यात वर पुनरुद्धृत केला आहे.

१०. प्रस्तुत अवमानाची कार्यवाही सुरू झाल्यानंतर आणि उत्तरवादींना प्रस्तुत कार्यवाहीमध्ये नोटीस बजावण्यात आल्यानंतर, उत्तरवादींनी त्यानंतर विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र. १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मधील दिनांक २८.१०.२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्यासाठी संकीर्ण अर्ज क्रमांक ६१/२०२२ दाखल केला. आता जे सादर निवेदन करण्यात आलेले आहेत, ते संकीर्ण अर्ज क्रमांक ६१/२०२२

च्या सुनावणीच्या वेळी केले गेले होते आणि दिनांक २५/०१/२०२२ रोजीच्या सविस्तर आदेशाद्वारे, या न्यायालयाने उक्त अर्ज फेटाळला. संकीर्ण अर्ज क्रमांक ६१/२०२२ मध्ये पारित केलेला आदेश यात खाली पुनरुद्धृत केला आहे :-

"१. अर्जदार - मूळ याचिकाकर्त्यांनी दिनांक २८.१०.२०२१ रोजी संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये पारित केलेला आदेश रद्द करण्याच्या प्रार्थनेसह प्रस्तुत संकीर्ण अर्ज दाखल केला आहे.

२.अर्जदारांच्या वतीने विद्वान वरिष्ठ अधिवक्ता श्री. श्याम दिवाण हे उपस्थित आहे आणि हरकत घेणाऱ्या उत्तरवादीच्या वतीने विद्वान वरिष्ठ अधिवक्ता श्री. जयंत भूषण हे उपस्थित झाले आहेत.

२.१ अर्जदारांच्या वतीने उपस्थित विद्वान वरिष्ठ अधिवक्ता श्री. श्याम दिवाण यांनी दिनांक २८.१०.२०२१ रोजीच्या संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये पारित केलेला आदेश रद्द करण्याच्या त्यांच्या प्रार्थनेच्या समर्थनार्थ पुढीलप्रमाणे निवेदन केले आहे :-

i) संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ निकाली काढलेल्या प्रकरणात दाखल करण्यात आल्यामुळे स्वतः च दाखल करून घेण्यायोग्य नव्हती;

ii) अर्जदारांना, म्हणजे मूळ याचिकाकर्त्यांना संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये कोणतीही नोटीस बजावण्यात आली नाही आणि अर्जदारांच्या वतीने कोणतेही उत्तर दाखल करण्यात आले नाही; आणि

iii) अर्जदारांनी दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिकेत, हे न्यायालय दिनांक २८.१०.२०२१ रोजीच्या आदेशान्वये पारित केल्याप्रमाणे निर्देश देऊ शकत नव्हते. अर्जदारांनी, उच्च न्यायालयाने दिनांक ०८.०८.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन केले नाही, ज्याचा या न्यायालयासमोर आक्षेप घेण्यात आला होता आणि या न्यायालयाने वाढवून दिलेल्या वाढीव कालावधीतही रक्कम जमा केली गेली नव्हती, असे गृहीत धरून असे सादर केले आहे की, तशा प्रकरणात, एकमात्र परिणाम असा होईल की लवाद निवाड्याला स्थगिती दिली जाणार नाही आणि अंमलबजावणीची कार्यवाही पुढे चालू ठेवली जाईल. म्हणून, अर्जदार-मूळ

याचिकाकर्त्यांना उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जमा करावयाची रक्कम सकारात्मकपणे जमा करणे आणि या न्यायालयाने दिलेल्या मुदतीत जमा करण्याचे निर्देश देणारे दिनांक २८.१०.२०२१ रोजीच्या आदेशात देण्यात आलेले निर्देश आणि त्याचे अनुपालन न करणे अत्यंत गंभीर मानण्यात येईल आणि आक्षेपित आदेशात उच्च न्यायालयाने निर्देश दिल्याप्रमाणे रक्कम जमा ना करणे हे गंभीर परिणाम असणाऱ्या आमच्या आदेशाचे अनुपालन नाही केले असे मानण्यात येईल, असे मुळीच समर्थनपर नव्हते आणि / किंवा असा आदेश पारित केला जाऊ शकत नव्हता.

३. आम्ही अर्जदारांच्या वतीने उपस्थित विद्वान वरिष्ठ अधिवक्ता श्री. श्याम दिवाण यांचे म्हणणे प्रदीर्घ ऐकले.

सुरुवातीला याची नोंद घेणे आवश्यक आहे की, जेव्हा या न्यायालयाने दिनांक २८.१०.२०२१ रोजीचा आदेश पारित केला, तेव्हा अर्जदार - मूळ याचिकाकर्त्यांच्या वतीने विद्वान अधिवक्ता श्री कुणाल वजानी उपस्थित राहिले आणि या न्यायालयाने अर्जदार - मूळ याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकल्यानंतर दिनांक २८.१०.२०२१ रोजीचा आदेश पारित केला. संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ ची प्रत अधिवक्त्यास देण्यात आली आणि त्यानंतर ते उपस्थित राहिले आणि अर्जदारांच्या वतीने उपस्थित विद्वान अधिवक्ता श्री. कुणाल वजानी यांचे म्हणणे ऐकल्यानंतर, या न्यायालयाने दिनांक २८.१०.२०२१ रोजीचा आदेश पारित केला. त्यावेळी, अर्जदारांना उत्तर दाखल करण्यास शक्य होईल यासाठी प्रकरण तहकूब करण्याची कोणतीही विनंती करण्यात आली नव्हती किंवा संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ दाखल करून घेण्याची योग्यता नसल्याबाबत कोणताही आक्षेप घेण्यात आला नव्हता. त्यामुळे आता अर्जदारांना संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ दाखल करून घेण्याची योग्यता नसल्याबाबत आणि / किंवा कोणतीही नोटीस देण्यात आली नव्हती याबाबत तक्रार करण्याची मुभा नाही.

४. अन्यथा देखील, अशी नोंद घेणे आवश्यक आहे की प्रस्तुतचा अर्ज हा दुसरे काही नसून पश्चात बुद्धीने केला आहे आणि केवळ अवमान याचिका क्र. ९४०/२०२१ अन्वये उत्तरवादीने सुरू केलेल्या अवमान कार्यवाहीतून बाहेर पडण्याच्या हेतूने केला आहे. हे लक्षात

घेण्यासारखे आहे की दिनांक २८.१०.२०२१ रोजीचा आदेश हा अर्जदारांच्या वतीने विद्वान अधिवक्त्यांच्या उपस्थितीत पारित करण्यात आला होता. अर्जदारांच्या वतीने जे उपस्थित झाले त्या विद्वान अधिवक्त्यांचे म्हणणे ऐकून घेतले गेले. दिनांक २८.१०.२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्यासाठीचा प्रस्तुत अर्ज हा जवळजवळ अडीच महिन्यांच्या कालावधीनंतर, म्हणजे दिनांक १७/०१/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे आणि तोही अवमान कार्यवाहीत या न्यायालयाने नोटीस जारी केला त्यानंतर आणि अवमान याचिकेची नोटीस अर्जदारांवर बजावण्यात आली त्यानंतर दाखल करण्यात आला. त्यामुळे प्रस्तुत अर्ज दुसरे काही नसून पश्चात बुद्धीने आणि केवळ अवमान कार्यवाही, जी मागे दिनांक १८/११/२०२१ रोजी सुरू करण्यात येऊन दाखल करण्यात आली आणि दिनांक १०/१२/२०२१ रोजी नोटीस बजावण्यात आली, त्या अवमान कार्यवाहीतून बाहेर पडण्याच्या हेतूने केली आहे.

५. अन्यथा गुणावगुणावरून पाहता सुद्धा, संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये पारित केलेला दिनांक १८/११/२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्याची आवश्यकता नाही. याची नोंद घ्यावयास हवी की, विशेष अनुमती याचिका ही वाणिज्यिक लवाद याचिका क्र. ५५/२०१९ मधील प्रस्ताव सूचना क्र. ९६०/२०१९ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०८/२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशामुळे उद्भवली होती. यातील अर्जदारांनी दिनांक ०८/०८/२०१९ पासून बारा आठवड्यांच्या आत निवाडा रकमेच्या ५० टक्के एवढी रक्कम जमा करेल अशा अटीच्या अधीन, प्रार्थना खंड (अ ) च्या अनुसार प्रस्तावाची सूचना कायम करण्यात आली होती. यातील अर्जदारांच्या सांगण्यावरून उच्च न्यायालयाने दिलेली मुदत वेळोवेळी वाढवण्यात आली, परंतु अर्जदारांनी रक्कम जमा केली नाही आणि प्रकरण तसेच निवाड्याची अंमलबजावणीसुद्धा लांबवली. त्यानंतर मुदतवाढ मिळाल्यानंतर, अर्जदारांनी रक्कम जमा केली नाही, अर्जदारांनी उशिराने दिनांक २०/०८/२०२१ रोजी प्रस्तुत विशेष अनुमती याचिका विलंब माफीच्या अर्जासह या न्यायालयासमोर दाखल केली. तरीही, या न्यायालयाने एकतर्फी विलंब माफ केला आणि अर्जदारांच्या वतीने उपस्थित विद्वान अधिवक्त्यानी केलेल्या प्रार्थनेप्रमाणे, उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यासाठी दिनांक १७/०९/२०२१ पासून आणखी आठ आठवड्यांची मुदत दिली.

६.	दिनांक १७/०९/२०२१ रोजीचा आदेश एकतर्फी आणि उत्तरवादीला नोटीस न देता पारित केल्यामुळे, उत्तरवादीने इतर गोष्टींबरोबरच असे म्हणणे असणारे, अर्जदारांच्या वतीने अंमलबजावणीस विलंब करण्याचे सर्व प्रयत्न केले आहे आणि आणखी आठ आठवड्यांचा वेळ केवळ वाया घालवण्यासाठी मागितला आणि रक्कम जमा करण्याचा आणि/किंवा उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुपालन करण्याचा कोणताही हेतू नाही, दिनांक १७/०९/२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्यासाठी संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ दाखल केला. त्यामुळे, संबंधित पक्षांच्या विद्वान अधिवक्त्यांचे म्हणणे ऐकून आणि उत्तरवादीच्या आशंकेचा विचार करून की केवळ वेळ वाया घालवण्यासाठी आणि प्रकरणाला आणखी लांबवण्यासाठी वेळ वाढवण्याची मागणी केली आहे आणि दिनांक ०८/०८/२०१९ रोजीच्या आदेशाचे अनुपालन करण्याचा कोणताही हेतू नाही आणि अर्जदारांनी जरी उच्च न्यायालयाने वेळ वाढवल्याने पुरेसा सहभाग दर्शविला असला तरी रक्कम जमा करण्यात आली नाही आणि म्हणून प्रकरणातील विशिष्ट तथ्ये आणि परिस्थिती पाहता, आम्ही दिनांक २८/१०/२०२१ रोजीचा आदेश पारित केला. त्यामुळे प्रकरणातील विशिष्ट तथ्ये आणि परिस्थिती पाहून दिनांक २८/१०/२०२१ रोजीचा आदेश पारित केला तेव्हा अर्जदारांच्या वतीने उपस्थित विद्वान अधिवक्त्याचे सुद्धा म्हणणे ऐकल्यानंतर पारित करण्यात आलेला तो आदेश रद्द करण्याची आवश्यकता नाही.

७.	या टप्प्यावर अशी नोंद घेणे आवश्यक आहे की, दिनांक १७/०९/२०२१ रोजीच्या आदेशानंतरही, ज्याद्वारे आणखी आठ आठवड्यांची मुदत देण्यात आली होती, मूळ याचिकाकर्ते म्हणजे अर्जदारांनी, उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन केले नाही, ज्यासाठी त्यांनी मुदतवाढ मागितली होती. हे अर्जदारांची वर्तणूक दर्शविते. त्यानंतरही मुदतवाढीसाठी कोणताही अर्ज केलेला नाही.

उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन करण्यासाठी मुदतवाढीच्या दिनांक १७/०९/२०२१ च्या आदेशाचा फायदा/लाभ घेतल्यावर, अर्जदारांना त्यानंतर असे युक्तिवाद करण्याची मुभा राहणार नाही की त्याचे अनुपालन न केल्यास, लवाद कायद्यांतर्गत आवश्यक परिणाम होऊ शकतात आणि अंमलबजावणीची कार्यवाही पुढे चालू ठेवावयास हवी. जसे असेल त्याप्रमाणे राहू दिले तरी, जेव्हा दोन्ही पक्षांच्या विद्वान अधिवक्त्यांचे म्हणणे

ऐकल्यानंतर दिनांक २८/१०/२०२१ रोजीचा आदेश पारित केला गेला आहे आणि यात वर म्हटल्याप्रमाणे उत्तरवादीच्या या आशंकेचा विचार करून की अर्जदारांचा उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे अनुपालन करण्याचा कोणताही हेतू नाही आणि त्यांना केवळ कार्यवाहीस विलंब करायचा आहे, दिनांक २८/१०/२०२१ रोजीचा आदेश पारित करण्यात आला आहे. त्यामुळे संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये पारित केलेला दिनांक २८/१०/२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्यासाठी कोणतेही तथ्य सिद्ध झालेले नाही.

८. वरील बाबी लक्षात घेऊन आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे, प्रस्तुत अर्ज खारीज केला जातो."

११. म्हणून, एकदा का संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मधील दिनांक २८/१०/२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्यासाठी केलेला संकीर्ण अर्ज क्रमांक ६१/२०२२ खारीज केला जातो, उत्तरवादींना संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये पारित केलेल्या दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या आदेशाचे अनुपालन करायचे होते. अन्यथा सुद्धा, उत्तरवादींना दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या आदेशाचे अनुपालन करणे आवश्यक होते.

१२. दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या आदेशात या न्यायालयाने विशिष्ट निर्देश दिले आहेत ज्याद्वारे उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार उत्तरवादींना जमा करावयाची रक्कम सकारात्मकपणे आणि या न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र. १४७२४/२०२१ मध्ये दिनांक १७/०९/२०२१ रोजीच्या आदेशामध्ये दिलेल्या कालावधीत जमा करण्याचे निर्देश दिले आहेत, असे असून देखील उत्तरवादींचे या न्यायालयासमोर सादर करण्याचे फाजील धाडस आहे की या न्यायालयाने दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या आदेशात कोणतेही निर्देश जारी केलेले नाहीत. या टप्प्यावर, अशी नोंद घेणे आवश्यक आहे की, संकीर्ण अर्ज क्र. ६१/२०२२ मध्ये देखील, यातील उत्तरवादींच्या वतीने असे विनिर्दिष्ट म्हणणे होते की दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या आदेशाच्या आधारे, पैसे जमा करण्याच्या अटीचे या न्यायालयाच्या अनिवार्य निर्देशामध्ये रूपांतर करण्यात आले आहे. म्हणून, उत्तरवादींच्या वतीने हे विशिष्ट प्रकरण होते की दिनांक २८/१०/२०२१ रोजीचा आदेश हा एक अनिवार्य निर्देश आहे आणि म्हणून दिनांक २८/१०/२०२१ रोजीचा आदेश रद्द करण्याची विनंती करण्यात आली. असे असेल तर, त्यानंतर उत्तरवादींना दिनांक

२८/१०/२०२१ रोजीचा आदेश हा अनिवार्य निर्देश नाही असे म्हणण्याची परवानगी कशी दिली जाऊ शकते ? अशी भूमिका घेऊन उत्तरवादींनी अवमानना आणि त्यांच्या अप्रामाणिक वागणुकीला अधिकच खतपाणी घातले आहे.

१३. दिनांक २८/१०/२०२१ रोजीच्या आदेशात, या न्यायालयाने यातील उत्तरवादी -विशेष अनुमती याचिकेतील मूळ याचिकाकर्त्यांना निर्देश देणारे एक विशिष्ट निर्देश दिले की, उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाप्रमाणे जमा करावयाची रक्कम सकारात्मकपणे आणि या न्यायालयाने दिनांक १७/०९/२०२१ रोजीच्या आदेशात नमूद केलेल्या (आठ आठवडे) कालावधीत जमा करावी. तसेच, या न्यायालयाने विनिर्देशपूर्वक असे मत व्यक्त केले होते की, सदर आदेशाचे अनुपालन न करणे हे अत्यंत गंभीर मानले जाईल आणि उच्च न्यायालयाने निर्देशित केल्याप्रमाणे रक्कम जमा न करणे हे या न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन न करणे असे मानले जाईल आणि त्याचे गंभीर परिणाम देखील होईल. वरील प्रमाणे परिस्थिती असून देखील, उत्तरवादींनी संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये दिनांक २८/१०/२०२१ रोजी दिलेल्या आदेशाचे सुद्धा अनुपालन केले नाही. याउलट, दिनांक २८/१०/२०२१ च्या आदेशात दिलेले विशिष्ट निर्देश आणि दिनांक २५/०१/२०२२ च्या आदेशानुसार संकीर्ण अर्ज क्रमांक ६१/२०२२ फेटाळला, असे असून देखील उत्तरवादींनी अनुपालन न करण्याची आणि अवज्ञा करण्याची आणि पूर्वी सादर केलेल्या निवेदनाप्रमाणे जे तपशीलवार आदेशाद्वारे नाकारले गेले होते, तत्सम निवेदन सादर करण्याची त्यांची कठोर वृत्ती कायम ठेवली आहे . या न्यायालयाने दिनांक २८/१०/२०२१ रोजी संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मधील आदेशात निर्देश/आदेश पारित करूनही, त्याची अवज्ञा केली आहे / अनुपालन केले नाही आणि प्रकरणाच्या या बाबी लक्षात घेता, उत्तरवादींच्या वतीने उपस्थित विद्वान वरिष्ठ अधिवक्ता श्री. श्याम दिवाण हे ज्या अंमलबजावणीच्या स्वरूपात उपलब्ध असलेल्या पर्यायी उपायाबाबतच्या निर्णयावर विसंबून आहेत, ते निर्णय कोणत्याही प्रकारे मदत करणारे नाही आणि हातात असलेल्या प्रकरणाची वस्तुस्थिती लक्षात घेता लागू होत नाही.

१३.१ रक्कम जमा करण्याच्या अटीचे पालन न केल्याने केवळ लवाद निवाडा अंमलबजावणी योग्य ठरेल, अनिवार्य नसलेल्या अशा अटींचे पालन न केल्याबद्दल अवमान

कार्यवाही सुरू केली जाऊ नये या त्याच्या युक्तिवादाला दृढ करण्यासाठी उत्तरवादी - अवमानकर्ताच्या वतीने उपस्थित विद्वान वरिष्ठ अधिवक्त्यानी खालील प्रकरणातील कायद्याचे संदर्भ उद्धृत केले :-

**i) सुधीर वासुदेवा विरुद्ध एम. जॉर्ज रविशेखरन-[(२०१४)३ एस. सी. सी. ३७३]** ज्यामध्ये, या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ अंतर्गत अधिकार क्षेत्राचा वापर करणाऱ्या न्यायालयाने अवमानाचा आरोप केलेल्या आदेशाच्या चार कोपऱ्यांच्या पलीकडे जाऊ नये. म्हणजे अवमान याचिकेवर सुनावणी करणाऱ्या न्यायालयाने आपल्या चौकशीची व्याप्ती अशा निर्देशांपुरती मर्यादित ठेवली पाहिजे जी न्यायनिर्णयात किंवा आदेशात स्पष्ट आहेत ज्याचा अवमान केल्याचा आरोप आहे.

आमचे असे मत आहे की हा निर्णय कोणत्याही प्रकारे उत्तरवादी -अवमानकर्ताच्या मदतीला येणार नाही, कारण ज्या आदेशांचा अवमान केल्याचा आरोप केला जातो, ते कोणत्याही प्रकारे पाहिले गेले तरी, आदेशांमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की अवमानकर्त्याने संबंधित आदेशांमध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत रक्कम जमा करणे आवश्यक आहे. अवमाननाची व्याप्ती कितीही संकुचित असली तरी,या न्यायालयाला कायद्याच्या अंतर्गत अधिकारक्षेत्रात त्वरित अशा परिस्थितीचे निराकरण करण्यास सक्षम करेल, ज्यामध्ये अवमानाचा आरोप करण्यात आला आहे, नि:संदिग्धपणे आणि स्पष्टपणे नोंदवले आहे की अवमानकर्त्याला त्यात निर्दिष्ट केलेल्या रकमा जमा करणे आवश्यक आहे. आदेशांतर्गत या निर्देशाचा इतर कोणत्याही प्रकारे अर्थ लावला जाऊ शकत नाही.

**ii) आर. एन. डे आणि इतर-विरुद्ध भाग्यबती प्रामानिक आणि इतर-[(२०००) ४ एस. सी. सी. ४००]** ज्यामध्ये या न्यायालयाने असे मानले आहे की, अवमान कार्यवाही सुरू करण्याचे साधन हुकूमनामा निष्पादित करण्यासाठी किंवा आदेशाच्या अंमलबजावणीसाठी वापरले जाऊ शकत नाही. म्हणजेच, न्यायालयाने तेथे अवमान अधिकार क्षेत्रास आवाहन करू नये, जेथे आदेशाच्या अटी सुरक्षित करण्यासाठी पर्यायी उपाय उपलब्ध आहेत.

अवमानाच्या कार्यवाहीचे स्वरूप 'वेषांतर करून निष्पादनाची कार्यवाही' चे असू नये, या वस्तुस्थितीची आम्हाला जाणीव आहे. तथापि, आम्ही असे मानतो की उपरोल्लेखित प्रकरणातील कायद्याचे संदर्भ अवमानकर्त्यास  सहाय्यभूत ठरणार नाही कारण सदर प्रकरणातील वस्तुस्थिती सध्याच्या प्रकरणापेक्षा लक्षणीयरीत्या वेगळी होती. या प्रकरणात, ज्या आदेशाचा अवमान केल्याचा अभिकथन करण्यात आला होता, त्यावर कोणतीही स्थगिती देण्यात आली नव्हती. त्यामुळे त्यातील हुकूमनामा धारक अंमलबजावणीची कार्यवाही चांगल्या प्रकारे सुरू करू शकतो.  तथापि, प्रस्तुत प्रकरणात  उच्च न्यायालयाने दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या आदेशाद्वारे रक्कम जमा करण्याच्या अटीच्या अधीन राहून निवाड्याला स्थगिती दिली. अशा ठेवीची कालावधी या न्यायालयाने निहितार्थाने स्थगितीचा आदेश कायम ठेवून दोन वेळा वाढविली आहे. वाढीव मुदतीचा फायदा घेत, उत्तरवादी-अवमानकर्ता, या टप्प्यावर असा युक्तिवाद करू शकत नाही की ठेवीच्या अटींचे पालन न केल्यास  केवळ लवाद निवाड्याची अंमलबजावणी करावी लागेल आणि  त्याचे अनुपालन करण्यात आलेल्या अपयशामुळे न्यायालय अवमान कायदा, १९७१ अंतर्गत कोणतेही परिणाम होणार नाहीत.

१३.२  याव्यतिरिक्त, अवमान कार्यवाहीचा अवलंब केल्याविना सुद्धा, केवळ तो आदेश किंवा हुकूमनामा ज्याचा अवमान केल्याचे अभिकथन करण्यात आले आहे, तो कायद्यानुसार अंमलात आणता येण्याजोगा आहे, म्हणून या कायद्यांतर्गत न्यायालयाचे अधिकारक्षेत्र संपुष्टात येणार नाही, हा सामान्य कायदा आहे.

१३.३  अवमानकर्त्याचे वर्तन न्यायाच्या योग्य मार्गात अडथळा आणणारे असेल अशा प्रत्येक प्रकरणात अवमान अधिकारक्षेत्र लागू  केले जाईल; **राम नारंग-विरुद्ध -रमेश नारंग-[(२००६) ११ एस. सी. सी. ११४ पाहावे .** अवमान हा असा विषय आहे जो न्यायालयाने पारित केलेला आदेश ज्याचे अवमान करण्याचा अभिकथन करण्यात आला आहे,  तो आणि  अवमानकर्ता यांच्यातील आहे; अशा आदेशाच्या अंमलबजावणीबाबतचा प्रश्न हा एक असा प्रश्न आहे जो पक्षांच्या परस्पर संबंधांशी संबंधित आहे. अवमान अधिकारक्षेत्र लागू करण्याचा न्यायालयाचा अधिकार, कोणत्याही प्रकारे, पक्षांच्या परस्पर अधिकारांद्वारे बदललेला नाही.  **बँक ऑफ बडोदा-विरुद्ध- सदरुद्दीन हसन डाया -[(२०००) १ एस. सी. सी. ३६०]** पहावे.

१४. यापुढे, उत्तरवादींच्या वतीने असे म्हटले आहे की आतापर्यंत जाणूनबुजून अवज्ञा केली गेली नाही आणि आर्थिक अडचणींमुळे, उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०८/२०१९ रोजी आदेश दिल्याप्रमाणे आणि या न्यायायालयाने पारित केलेल्या आदेशाप्रमाणे उत्तरवादी हे रक्कम जमा करण्याच्या स्थितीत नाहीत, तो दुसरे काही नसून पश्चात बुद्धीने म्हटले आहे. यापूर्वी कधीही असा युक्तिवाद करण्यात आला नव्हता. प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती पाहता, अशा भूमिकेमध्ये आता प्रामाणिकतेचा अभाव आहे. दिनांक ०८/०८/२०१९ रोजी उच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये दिलेल्या आदेशातून आणि या न्यायालयाने दिनांक २८/१०/२०२१ रोजी दिलेल्या आदेशातून बाहेर पडण्यासाठी उत्तरवादींकडून सर्व प्रयत्न केले जात आहेत. जर उत्तरवादींचा स्पष्ट सद्‌हेतू होता आणि त्यांना खरोखरच उच्च न्यायालय आणि या न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करायचे होते, परंतु आर्थिक अडचणींमुळे ते पैसे जमा करू शकले नसते, तर त्या प्रकरणात त्यांनी त्यांच्या आर्थिक अडचणींची त्वरित विनंती करायला हवी होती आणि संकीर्ण अर्ज क्रमांक ६१/२०२२ मध्ये जी भूमिका घेतली गेली होती आणि जी आता पुन्हा एकदा घेतली गेली आहे, ती भूमिका त्यांनी घ्यायला नको होती.

वर निरीक्षण केल्याप्रमाणे, उच्च न्यायालयाने चेंबर समन्समध्ये दिलेला आदेश पारित झाल्याच्या तारखेपासून सुमारे दोन वर्षांच्या कालावधीनंतर उत्तरवादींनी त्यांची मालमत्ता सुद्धा उघड केली. म्हणून, आमचे असे मत आहे की उत्तरवादींनी आता आर्थिक अडचणींमुळे रक्कम जमा करण्याच्या आणि/किंवा उच्च न्यायालयाने आणि या न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन करण्याच्या स्थितीत नसल्याची भूमिका घेतली आहे आणि म्हणूनच उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशाचे आणि या न्यायालयाने दिनांक २८/१०/२०२१ रोजी विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये दिलेल्या आदेशाचे पालन न करण्यात उत्तरवादींनी जाणूनबुजून अवज्ञा केलेली नाही आणि ती आम्हाला अजिबात मान्य नाही.

१५. जेव्हा आदेशातील अटींचे किंवा निर्देशांचे अनुपालन करणे आवश्यक असलेल्या पक्षाने आदेशात नमूद केलेल्या वेळेच्या आत असे केले नसेल, तेव्हा अशा आदेशाचे पालन

करणे आवश्यक असलेल्या पक्षासाठी दोन पर्याय उपलब्ध असतात : (अ) ज्या परिस्थितीमुळे पक्ष न्यायालयाच्या आदेशाचे पालन करू शकला नाही त्याबद्दल न्यायालयाला स्पष्टीकरण देणे; (ब) न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी आणखी वेळ मागणे. जर आदेशाच्या अटींचे पालन करण्यात विलंब झाला असेल आणि आदेशाचे पालन करणाऱ्या पक्षाने दोन पर्यायांपैकी कोणत्याही पर्यायाचा अवलंब केला नसेल, तर अनुपालनातील विलंबासाठी जबाबदार असलेल्या पक्षाने अवमान केल्याचे मानले जाऊ शकते; **बिहार राज्य विरुद्ध सुभाष सिंग [(१९९७) ४ एस. सी. सी. ४३०]** पाहावे.

१५.१ पुढे, **मारुती उद्योग- विरुद्ध- महिंदर सी. मेहता- ए. आय. आर. २००८ एस. सी. ३०९** मधील या न्यायालयाचा निर्णय सुचवितो की, हुकूमनामा निष्पादित करण्यायोग्य आहे किंवा याची पर्वा न करता, अवमानासाठी खटला दाखल करण्यात आला आहे की नाही हे ठरवण्यासाठी या न्यायालयाद्वारे विचार केला जाणारा प्रश्न असा होता की, अवमानकर्त्याचे वर्तन असे होते की जे न्यायालयाच्या अवमानासाठी शिक्षा देण्यासाठी योग्य प्रकरण ठरेल.

१६. वर चर्चा केलेले कायदेशीर प्रस्ताव प्रस्तुत प्रकरणातील तथ्यांना लागू करताना, आमचे असे मत आहे की उत्तरवादी-अवमानकर्त्यांचे वर्तन असे आहे जे या न्यायालयाच्या अवमान अधिकारक्षेत्राच्या आवाहनाला न्याय्य ठरेल. अवमानकर्त्यांनी अशा कसूर केल्याचे कारण स्पष्ट न करता किंवा अनुपालनासाठी मुदत वाढवण्याची मागणी न करता या न्यायालयाच्या आदेशांचे अनुपालन करण्यात केवळ अवास्तव विलंब आणि चूकच केली नाही; परंतु त्याच्या अनुपालनासाठी दिलेल्या वाढीव कालावधीचा लाभ घेतल्यानंतरही त्यांनी आदेशाचे पालन टाळण्याचा प्रयत्न केला आहे. या टप्प्यावर अवमानकर्ते असा दावा करू शकत नाहीत की रक्कम जमा करण्याची आवश्यकता अनिवार्य नव्हे तर निदेशक आहे आणि त्यामुळे त्याचे अनुपालन न करणे हा अवमान ठरणार नाही.

१७. वरील बाबी लक्षात घेऊन आणि वर नमूद केलेली कारणे लक्षात घेऊन, आमचे ठाम मत आहे की उत्तरवादींनी वाणिज्यिक लवाद याचिका क्रमांक ५५/२०१९ मधील प्रस्ताव सूचना क्रमांक ९६०/२०१९ मध्ये उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशाचे जाणूनबुजून उल्लंघन केले आहे आणि विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये या न्यायालयाने दिनांक

२८/१०/२०२१ रोजी दिलेल्या आदेशाचे जाणीवपूर्वक उल्लंघन केले आहे आणि त्याद्वारे उत्तरवादींना दिवाणी अवमानासाठी दोषी ठरवले आहे आणि न्यायालय अवमान कायद्याच्या तरतुदींनुसार योग्य शिक्षेसाठी त्यांना स्वतः जबाबदार धरले आहे. वाणिज्यिक लवाद याचिका क्रमांक ५५/२०१९ मधील प्रस्ताव सूचना क्रमांक ९६०/२०१९ मध्ये उच्च न्यायालयाने दिनांक ०८/०८/२०१९ रोजी दिलेल्या आदेशाचे जाणूनबुजून उल्लंघन केल्याबद्दल आणि विशेषतः विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्रमांक १४७२४/२०२१ मधील संकीर्ण अर्ज क्रमांक १६६८/२०२१ मध्ये दिनांक २८/१०/२०२१ रोजी या न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल उत्तरवादींना, विशेषतः उत्तरवादी क्रमांक १, याद्वारे या न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल दोषी ठरवले जाते आणि न्यायालय अवमान कायद्याच्या तरतुदींनुसार त्यांना योग्य शिक्षा दिली जाते. आता उत्तरवादींचे शिक्षेवर म्हणणे ऐकले जाईल.

अवमान याचिका निकाली काढली.

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

**X–X–X-X**